# छात्र प्रबोधन

सौर आश्विन, शके १९४५ । वर्ष २४ अंक १।
(प्रारंभापासूनचा अंक क्रमांक – वर्ष ३२ अंक ३)
वार्षिक वर्गणी ₹ २५०। मूल्य ₹ २५। पृष्ठे २०

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक!











या पद्याची
चाल ऐका
आणि पद्य
म्हणा...

# दोघेही हवे !

राष्ट्ररथाला विजयी व्हाया समबल चक्रे दोन हवी
वज्रासम दृढनिश्चय आणिक बिजली सम समशेर हवी ।।धृ.।।

समाजपक्ष्या, नभ जिंकाया पंखहि तुजला दोन हवे
गती हवी तुज, दिशा हवी अन् अमोघ ऐसे धैर्य हवे।।

जीवन-अंकुर रुजुनी येण्या, सूर्यकरांची ऊब हवी
आणि त्याच्या भरण पोषणा माय मातिची प्रीत हवी।।


वादळवाऱ्यापासून जपण्या, कणखर, वत्सल हात हवे
दीपज्योतिला सुतेज करण्या अमृत हृदयातील हवे।।

रणभेरींचा घोष हवा अन् मुरलीचा स्वरस्पर्श हवा
दुष्टविनाशी शौर्यालागी ममतेचा आशीष हवा।।

शंकर करितो तांडव आणिक नृत्य देविचे लास्य असे
जगताच्या या मायपित्यांचे अपूर्व ऐसे ऐक्य असे।।

कोण श्रेष्ठ हा वाद कशाला? जग तर दोघांचे घडले
शिवशक्तीची गुंफण होऊन विश्वरूप दिसते सजले!।।

– वाचस्पती स्वर्णलता भिशीकर



**पद्याचा भावार्थ :** समाजजीवनात उन्नतीसाठी, राष्ट्राच्या प्रगतीसाठी स्त्री-पुरुष समानता, एकमेकांच्या कामाची संपूरकता महत्त्वाची आहे. हा विचार या पद्यात आग्रहाने मांडला आहे. दृढ निश्चय आणि पराक्रम या दोघांचे मिलन झाले तर राष्ट्ररथ स्त्री-पुरुष या दोन चाकांवर समर्थपणे घोडदौड करेल म्हणजेच देशाची प्रगती होईल. समाजपक्ष्याचे स्त्री-पुरुष हे दोन पंख आहेत. प्रगतीची उत्तुंग भरारी घ्यायची तर योग्य दिशा, गती आणि धैर्य यांचा मिलाफ व्हायला हवा. सक्षम पिढी घडवण्यासाठी पित्याचा खंबीर आधार आणि आईची माया-ममता दोन्हीची गरज असते. मुलांचे रक्षण करण्यासाठी कणखर प्रेमळ हातांचा आधार आणि अंत:करणातील ओलावा दोन्ही असायला हवं.

'साधूच्या रक्षणार्थ आणि दुष्टांच्या विनाशासाठी परमेश्वर अवतार घेतो' या प्रतिकांच्या साहाय्याने शौर्य आणि मायाममता, तांडव नृत्य आणि आनंदाची अभिव्यक्ती दर्शवणारे नृत्य दोन्हीची आवश्यकता समृद्ध मानवी जीवनासाठी असते, हा विचार या पद्यात मांडला आहे. 'शीव' आणि 'शक्ती' दोघांच्या एकत्रीकरणातून स्त्री आणि पुरुष या दोघांच्या वेगवेगळ्या क्षमतांचा मिलाफ झाला तर जीवन परिपूर्ण होईल. असे असताना कोण श्रेष्ठ, कोण कनिष्ठ हा वाद विसरून स्त्री-पुरुष दोघांनी एकमेकांच्या साहाय्याने पुढे गेलं तर मानवी जीवन पर्यायाने, समाजजीवन, राष्ट्रजीवन हे अधिक परिपूर्णतेकडे जाईल.

**ओळखा या किल्ल्यांना...! –** मुखपृष्ठावर दिलेल्या प्रकाशचित्रांवरून त्या-त्या किल्ल्यांची नावे ओळखा.

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

# छात्र प्रबोधन

**सौर आश्विन, शके १९४५। वर्ष २४ अंक १**
(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४/ऑगस्ट १९९२
एकूणात ३७५ वा अंक, वर्ष ३२ अंक ३)
**प्रकाशन दिनांक – सौर ९ आश्विन शके १९४५/१ ऑक्टोबर २०२३**

## अंतरंग

२. पद्य... **दोघेही हवे!*** - वाच. स्वर्णलता भिशीकर
३. **संवाद** - शिल्पा कुलकर्णी
४. कविता... **चल पुस्तक वाचू!*** - डी. के. शेख
५. कथा... **प्रवास सुखकर होवो!*** - एकनाथ आव्हाड
९. लेखमाला... **गप्पा आपल्या देशाच्या! – १०**
**भारतीयांची वेशभूषा वैविध्य आणि एकात्मता** - डॉ. वर्षा पाध्ये
१२. व्यक्तीपरिचय... **अजून चालतेची वाट-शिरीन इबादी*** - शैलजा देशमुख
१५. लेखमाला... **घेऊ प्रेरणा निसर्गापासून! – लेखांक ४**
**वेल्क्रोचे रहस्य!** - डॉ. नंदा हरम
१९. **ओळखा या कर्तृत्ववान भारतीय महिलांना...**
**याशिवाय :** हसा हसा (८), स्पर्धा निवेदन (१७),
वर्गोद्दिष्ट स्पर्धा*, दिवाळी अंक निवेदन, प्रतिसादी वाचकवीर (१८)

## संवाद

***प्रिय प्रबोधकांनो,***

*गणेश उत्सव जल्लोषात पार पडला असेल ना! त्यामध्ये नुसती प्रेक्षकाची भूमिका केली की, घरच्या, शाळेच्या, सोसायटीच्या गणेश उत्सवात उत्साहाने, सक्रिय सहभागी झाला होता? आपल्या सर्व सण–उत्सवांकडे त्यातील हेतू समजून घेऊन, भाव लक्षात घेऊन, डोळसपणे पाहायला हवं! त्यामध्ये काळानुरूप योग्य ते बदल करायला हवेत. म्हणजे सण साजरे करणं हे नुसतंच कर्मकांड राहणार नाही.*

*आपल्यातल्या सर्जनशीलतेला, कल्पकतेला सण, उत्सव संधी/वाव देत असतात. ती संधी तुम्ही आवर्जून घेतली पाहिजे. त्यामुळे तुमची आवड, कल, अभिरुची लक्षात येऊ लागते, मर्यादाही समजतात. कौशल्य वाढविण्याचे व मर्यादांवर मात करण्यासाठीचे प्रयत्न करणं, नवीन क्षितिजे पार करण्यासाठी मनापासून परिश्रम करणं म्हणजे 'सीमोल्लंघनच'! या विजयादशमीपासून असे सीमोल्लंघन तुम्ही करावे. मदतीला, प्रोत्साहन द्यायला आम्ही आहोतच. पुढाकार मात्र तुमचा हवा!*

*तुमच्या लाडक्या 'छात्र प्रबोधन'चे तीन दर्जेदार दिवाळी अंक (नित्य, सुबोध (ग्रामीण), इंग्रजी) १ नोव्हेंबर २०२३ नंतर तुम्हाला उपलब्ध होतील. त्याविषयीचे* ***निवेदन पान क्र.१८ वर वाचा.*** *छात्र प्रबोधनतर्फे योजलेल्या विविध स्पर्धा, उपक्रमांच्या आवाहनांना भरघोस प्रतिसाद द्या. त्यामध्ये सहभागी होऊन बक्षिसे मिळवा!*

***विजयादशमीच्या निमित्ताने सीमोल्लंघन करण्यासाठी तुम्हाला अनेक शुभेच्छा!***

तुमची,
**शिल्पाताई**

**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**मानद संपादक**
शैलजा देशमुख

**संपादक मंडळ**
वाच. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन,
स्वाती ताडफळे,
मल्हार अरणकल्ले

**कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**साहाय्यक कार्यकारी संपादक**
वैशाली दीक्षित

**मुखपृष्ठ प्रकाशचित्रे**
महेन्द्र सेठिया

**आतील चित्रे**
सायली कुलकर्णी

**छात्र प्रबोधन मासिकाची वर्गणी**
**वार्षिक :** ₹ २५०,
**द्वैवार्षिक :** ₹ ५००,
**त्रैवार्षिक :** ₹ ७००,
**दशवार्षिक :** ₹ २२००,
**इ–अंक वार्षिक वर्गणी :** ₹ १००
(दिवाळी अंक सोडून)

**या अंकाची किंमत : ₹ २५/–**
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ५० जादा

**पुस्तकांच्या ऑनलाइन खरेदीसाठी व मासिकाच्या ऑनलाइन सभासद नोंदणीसाठी**
**jpprakashane.org**
या संकेतस्थळाला भेट द्या!!

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे!... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ!!**

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे ➢ श्री. अनिल पालकर, सातारा ➢ श्री. सतिशचंद्र गोरे, पुणे ➢ श्री. गौरव मोडक, ठाणे ➢ डॉ. विकास हरताळकर, हरताळकर हॉस्पिटल, चोपडा, जि. जळगाव ➢ श्री. अनिरुद्ध शहापूरकर ➢ श्री. सौरभ फाटक, डोंबिवली

# चल पुस्तक वाचू...!

चल पुस्तक वाचू... चल पुस्तक वाचू...!
पुस्तकातले वेचून घेऊ, हिरे-माणके-पाचू

पुस्तक ज्याच्या हाती
ते ते जगास पुढती नेती
बुद्धीच्या जोरावरती
विश्‍व कवेत घेती
आदर्श घेऊनि आपण त्यांच्या
जवळपास रे पोचू...
चल पुस्तक वाचू...!

ग्रंथास गुरू मानले ज्यांनी
इतिहास घडवला त्यांनी
कठोर काळही कर्तृत्वाने
योग्य दिशेस वळवला
वळवू काळाला आपणही
आणिक यश रे खेचू
चल पुस्तक वाचू...!

पुस्तक माय-बाप होते
पुस्तक होते सखा
दूर सारते पुस्तक
अवघ्यांच्या रे दुःखा
दुःख संपवू जगातले अन्
ओठी फुलवू हासू
चल पुस्तक वाचू...!



– डी. के. शेख
गल्ली नं. ९ शम्स् चौक, खाजानगर, धाराशिव 413501

(१५ ऑक्टोबर हा भारतरत्न ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन, 'वाचक प्रेरणा दिन' म्हणून आपण साजरा करतो. त्याला प्रोत्साहन देणारी ही कविता त्या दिवशी प्रार्थनेच्या वेळी अवश्य म्हणावी.)

**नक्की ऐका**
**पुस्तक परिचय**
**गोष्टीत सृष्टीत**
**लेखक – अनिल अवचट**
**वाचनस्वर – जयश्री काटीकर**

वार्षिक देणगीदार - ➢ वाच. अजित कानिटकर, पुणे ➢ श्री. प्रसाद सांडभोर ➢ सौ. सुचेता सोनी ➢ सौ. रजनी सोहनी, पुणे ➢ सौ. वृषाली दिलीप अदवंत, पुणे ➢ सौ. स्मिता चावरे, ऐरोली, नवी मुंबई ➢ रेडीयन्स ए. बी. लोढा मेमोरिअल फाउंडेशन, नाशिक ➢ डॉ. प्रतीक रवींद्र सेठिया, येरवडा, पुणे ➢ गेझनर इंडिया प्रा. लि., पुणे ➢ श्री. विनोद कुलकर्णी, पुणे

''हृषीकेश दिसला का रे मुलांनो तुम्हाला?'' मी जरा काळजीनंच मुलांना विचारलं.

''नाही सर, तो तर आज आलाच नाही,'' एका विद्यार्थ्यानं तत्परतेनं सांगितलं.

*पेपर* सुरू होऊन जवळजवळ अर्धा तास झाला होता आणि इथे हृषीकेशचा अजूनही पत्ता नव्हता. मला त्याची चिंता वाटायला लागली. परीक्षेच्या बाबतीत तो हलगर्जीपणा दाखवणारा मुलगा नाही. सातवी 'अ'च्या वर्गातला सर्वांत हुशार, गुणी आणि होतकरू विद्यार्थी आहे तो.

वार्षिक परीक्षा सुरू झाल्या होत्या. तोंडी परीक्षा घेत असतानाच हृषीकेशची लेखी परीक्षेचीही छान तयारी झालीये, हे माझ्या लक्षात आलं होतं. मराठी तर त्याचा सर्वांत आवडता विषय आणि नेमका त्याच विषयाच्या *पेपरला* तो आला नाही. मला कळेना, आता नेमकं काय करावं ते. बरं त्याच्या घरी *मोबाइलही* नव्हता. असता तर तो परीक्षेला का आला नाही, हे निदान विचारता तरी आलं असतं. काय झालं असेल देव जाणे. काहीच कळायला मार्ग नव्हता. हृषीकेशची वाट पाहून मी थकलो होतो; पण हृषीकेश शेवटपर्यंत *पेपरला* आलाच नाही.

दुसऱ्या दिवशी *पेपर* सुरू होऊन पंधरा मिनिटे झाली असतील, तेवढ्यात हृषीकेश वर्गाकडे धावत जाताना मला लांबूनच दिसला. मी त्याच्या मागून वर्गात आलो. तो मला काही सांगणार तेवढ्यात मीच म्हणालो, ''अरे, काल परीक्षेला आलाच नाहीस आणि आज आलास तेही उशिरा. हे बघ, आधी आता शांतपणे व्यवस्थित *पेपर* लिही. *पेपर* झाल्यावर मग बोलू आपण. *पेपर* संपल्यावर मला भेटल्याशिवाय जाऊ नकोस.''

त्याने होकारार्थी मान हलवली. बरोबर दोन तासांनी *पेपरची* वेळ संपल्याची घंटा झाली. मुलं पर्यवेक्षकांकडे *पेपर* देऊन भराभर वर्गाबाहेर पडली. हृषीकेश शिक्षक खोलीत माझ्याकडे आला.

मी त्याला रागानंच विचारलं, ''काल मराठीच्या *पेपरला* तू का आला नाहीस? परीक्षा म्हणजे खेळ वाटतो का तुला?''


''नाही सर, घर बदललं आम्ही,'' हृषीकेशनं सांगितलं.

कथा

## प्रवास सुखकर होवो!

**– एकनाथ आव्हाड**





‘‘असं अचानक?’’

‘‘होय सर, वडिलांना घराचं भाडं द्यायला जमत नव्हतं, म्हणून घरमालकानं घराबाहेर काढलं आम्हाला,’’ हृषीकेश उत्तरला.

‘‘मग आता?’’

‘‘आता आम्ही तात्पुरतं वाशीनाक्याला माझ्या काकांकडे राहतोय. कालचा दिवस आई-बाबांसोबत सामान वाहण्यात आणि ते लावण्यातच गेला. शाळेपासून आता हे आमचं नवीन घर लांब आहे. बसनं यावं लागतं. बरं काल शाळेत बसने यायला-जायला घरात पैसेही नव्हते. आम्ही काकांकडे मागितले नाहीत. बाबा म्हणाले, त्यांनी आपल्याला आसरा दिला, हीच मोठी गोष्ट आहे आपल्यासाठी. आता आणखी कसलाही त्रास त्यांना द्यायचा नाही.’’

मला क्षणभर काय बोलावं ते कळेना.

‘‘बरं, जा तू आता घरी. मुख्याध्यापकांना विचारून तुझा कालचा *पेपर* घेता येतो का ते बघू या आपण; पण उद्यापासून वेळेवर परीक्षेला ये. काहीही झालं तरी *पेपर* चुकवू नकोस. बसने यायला-जायला तुझ्याकडे तिकिटाचे पैसे आहेत का?’’

‘‘होय सर, वडिलांनी सध्या थोडे पैसे हातउसने घेतलेत. वडिलांची नोकरी गेलीये ना सर. ते नवीन नोकरी शोधतायेत. त्यात आईचं आजारपणही वाढलंय. आई म्हणते, सगळ्याच बाजूने अडचणी आल्या आहेत, आपली परीक्षा पाहायला. दुष्काळात तेरावा महिनाच सुरू आहे सध्या. बाबांनी आधीच्या घरमालकाला खूप विनंती केली की, पोराची परीक्षा होईपर्यंत इथं राहू द्या म्हणून; पण घरमालकाने जरासुद्धा दयामाया दाखवली नाही. सर, माणसं अशी का बरं वागतात?’’

मी पुन्हा गप्प झालो. काय बोलावं ते सुचेना. काही प्रश्न निरुत्तर करून टाकतात हेच खरं.

मी पाकिटातून शंभर रुपयांची नोट काढली आणि ती हृषीकेशच्या हातात देत म्हणालो, ‘‘हे बघ आता बाकीचा विचार करू नकोस. अभ्यासाकडे लक्ष

वार्षिक देणगीदार - ➢ श्रीमती रंजना कुलकर्णी, सातारा ➢ श्री. अभिजित लिमये ➢ श्री. प्रशांत माने, पुणे ➢ श्री. विक्रम कामठे, पुणे ➢ श्री. अभय गाडगीळ, पुणे ➢ सौ. सायली मुळ्ये ➢ श्री. शरद पालकर, पुणे ➢ श्री. नागेश साने, पुणे ➢ श्री. मिलिंद बर्वे, पुणे ➢ सौ. किरण सुबोध कुलकर्णी, सांगली ➢ श्री. सुदीप सुभेदार - कै. प्रभाकर सुभेदार स्मरणार्थ

दे आणि हे शंभर रुपये राहू देत तुझ्याकडे. वेळेला तिकिटासाठी उपयोगी पडतील. परीक्षेला वेळेवर बसने येत जा.''

हृषीकेश मानी स्वभावाचा असल्याने म्हणाला, ''नको सर, बससाठी सध्या आहेत पैसे. काहीही झालं, तरी यापुढे मी परीक्षा चुकवणार नाही. वेळेवर येत जाईन मी.''

''हे बघ, असू देत ते. प्रवासात, अडीअडचणीला तुझ्या कामी येतील. बरं जा लवकर आता. परत घरी जायला उशीर होईल आणि उद्याच्या परीक्षेचा अभ्यासही करायचा असेल तुला,'' मी बळंच त्याच्या शर्टाच्या खिशात शंभरची नोट कोंबली.

हृषीकेश माझ्याही नकळत पटकन खाली वाकून माझ्या पाया पडला आणि शिक्षक खोलीतून बाहेर पडला.

त्यानंतर हृषीकेश रोजच परीक्षेला वेळेवर शाळेत यायचा. सगळे *पेपर* त्याला चांगले गेले! मी मुख्याध्यापकांना भेटून हृषीकेशचा राहिलेला मराठीचा *पेपर* घेण्यासाठी विनंती केली. त्यांनीही माझी विनंती लगेच मान्य केली; कारण हृषीकेशचा अभ्यासूपणा त्यांनाही माहीत होता. अशा गुणी विद्यार्थ्याचं शैक्षणिक नुकसान होऊ नये, असं त्यांनाही वाटत होतं. हृषीकेशनं मराठीचा *पेपर* दिला, तेव्हा त्याला केवढा आनंद झाला होता! त्याचा तो फुललेला चेहरा पाहून माझाही चेहरा आनंदाने फुलून गेला. हृषीकेशसारख्या हुशार, नम्र विद्यार्थ्याचं नुकसान झालं नाही, याचं मनाला समाधान लाभलं.

परीक्षा झाल्यानंतर मुलांना सुट्ट्या लागल्या. आम्ही शिक्षक मात्र निकालाच्या कामात गुरफटून गेलो. *पेपर* तपासणे, परीक्षेचा निकाल तयार करणं, प्रगतिपुस्तकं भरणं या कामाला लागलो. मुलं निकालाची वाट पाहत होती. अखेर मुलांना प्रगतिपुस्तकं वाटण्याचा दिवस उजाडला. निकालाच्या दिवशी हृषीकेश आणि त्याच्यासोबतची सगळी वर्गातली मुलं निकाल घ्यायला उत्साहानं शाळेत आली. आमच्या शाळेत, दर्शनी फलकावर प्रत्येक वर्गातून पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्याचं नाव लिहिण्याची पद्धत आहे. इयत्ता सातवीमध्ये सर्व तुकड्यांमधून पहिल्या आलेल्या विद्यार्थ्याचं नाव फलकावर लिहिलं होतं, 'हृषीकेश नामदेव खरटमोल.' हृषीकेशला फलकावर आपलं नाव पाहून अत्यानंद झाला! शिक्षकांनी त्याचं तोंडभरून कौतुक केलं. त्याच्या वर्गमित्रांनी देखील त्याचं अभिनंदन केलं!

हृषीकेश निकाल घेण्यासाठी माझ्याकडे आला. त्यानं माझ्याकडून निकाल घेतला. खाकी रंगाच्या कागदापासून घरीच हातानं तयार केलेलं एक छोटंसं पाकीट त्यानं माझ्याकडे दिलं आणि नमस्कार करून लगेच घरी जायला निघाला. माझ्याभोवती निकाल घेण्यासाठी मुलांची बरीच गर्दी होती, म्हणून मी हृषीकेशनं दिलेलं पाकीट घाईनंच टेबलाच्या खणात ठेवलं. निकाल घेऊन सगळी मुलं निघून गेल्यानंतर काहीतरी कामानिमित्त मी *टेबलाचा* खण उघडला आणि मला हृषीकेशनं दिलेलं ते पाकीट दिसलं. मी पाकीट उघडलं, तर आत एक शंभरची नोट आणि छोटी चिठ्ठी होती. मी चिठ्ठी उघडली. त्यात त्यानं लिहिलं होतं, 'सर तुम्ही वेळेला मला बस प्रवासासाठी शंभर रुपये

तू वात्सल्याने भरलेली, तू प्रेमाचे गं कोंदण। तुझ्याने जग होते परिपूर्ण, तू मांगल्याचे गं गोंदण।।

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. सचिन गाडगीळ, पुणे ➢ श्री. समीर गांधी, बेंगळुरु ➢ श्री. ओंकार चांदोरकर ➢ श्री. श्रीकृष्ण करंदीकर ➢ श्री. अजय फाटक, पुणे ➢ श्री. अरविंद परांजपे, पुणे ➢ श्रीमती स्नेहलता गणेश गद्रे, पालशेत, ता. गुहागर ➢ डॉ. स्वप्नील कर्णे, पुणे

दिले होते. ते ‘शंभर रुपये’ त्यावेळी मला लाख मोलाचे वाटत होते! कारण त्याच पैशानं मी रोजचा बसचा प्रवास करून शाळेच्या परीक्षेला वेळेवर पोहोचू शकलो. माझा राहिलेला मराठीचा *पेपर* आपल्यामुळेच मी देऊ शकलो. माझी शिक्षणाची अवघड वाट आपण सोपी केली. तुम्ही केलेली ही मदत मी आयुष्यात कधीच विसरू शकणार नाही.

परीक्षा झाल्यानंतर मी आमच्या घराजवळच असणाऱ्या किराणा दुकानात कामाला लागलो. पंधरा दिवस काम केल्याचा जो काही पगार मिळाला त्यातले शंभर रुपये मी आपल्याला पाठवत आहे. कृपया त्याचा स्वीकार करावा, ही विनंती!

आपला आज्ञाधारक विद्यार्थी,
हृषीकेश.’

त्यातील शंभर रुपयांकडे मी कितीतरी वेळ पाहतच राहिलो. हृषीकेशबद्दलचा जिव्हाळा आणखी वाढला. जूनमध्ये शाळा सुरू झाल्यावर हृषीकेशच्या प्रवासाचा प्रश्न आपण कायमस्वरूपी सोडवण्याचा विचार माझ्या मनात मूळ धरू लागला आणि पटकन मला आठवलं की, माझ्या मुलाची घरात पडून राहिलेली सायकल, आपण नवीन करून घेऊ आणि हृषीकेशला देऊ; पण दुसऱ्याच क्षणी माझ्या मनात विचार आला की, ‘मानी स्वभावाचा हृषीकेश ती सायकल घेईल ना? का तोच त्याचा त्याच्या प्रश्नावर मार्ग शोधेल?’

‘हृषीकेशशी बोलून तर पाहू,’ हा विचार करत मी देवाजवळ प्रार्थना केली, ‘देवा काहीही झालं तरी, हृषीकेशच्या शिक्षणाचा प्रवास सुखकर होऊ दे!’

❀❀❀

**– एकनाथ आव्हाड**
शृंगारपुरे हाऊस, फ्लॅट नं. १, ए विंग,
१० वा, रोड, सांडू गार्डन बसस्टॉपजवळ
चेंबूर, मुंबई 400071

**अवश्य वाचा**
**कथा – स्वामी**
**अनु. शैलजा देशमुख**
**वाचनस्वर – ओंकार माहोरकर**

## हसा हसा...



एका कवीनं आपल्या मित्राला आपल्या घरी रात्री जेवायला येण्याचं निमंत्रण दिलं. ही गोष्ट त्या कवीनं पत्नीला सांगताच ती म्हणाली, ‘‘हे पाहा, त्या तुमच्या मित्राला जेवायला बोलावण्याबद्दल मला काही म्हणायचं नाही. पण जेवण झाल्यावर फार तर दहा-साडेदहापर्यंत तुम्ही त्याच्याशी गप्पा मारा आणि मग लगेच त्याला निरोप द्या. नाहीतर मागल्या वेळेप्रमाणे तुम्ही दोघं रात्री दोन-अडीचपर्यंत निरर्थक चकाट्या पिटत राहाल.’’


कवी म्हणाला, ‘‘अगं पण साडेदहा वाजले रे वाजले की, ‘आता तू घरी जा’ असं कसं त्याला सांगता येईल?’’ यावर कवीची पत्नी म्हणाली, ‘‘पण मी कुठं तुमच्या मित्राला ‘आता तू घरी जा’ असं म्हणायला सांगते? माझं सांगणं एवढंच आहे की, तुम्ही त्याला तुमच्या कविता गाऊन दाखवायला सुरुवात करा, म्हणजे बघा तो कसा चार-पाच मिनिटांत अगदी आपणहून त्याच्या घराचा रस्ता धरेल.’’

वार्षिक देणगीदार - ➢ सौ. शशिकला उपाध्ये, चंद्रकला प्रकाशन, पुणे ➢ सौ. सुनिता जयंत देगावकर, पुणे ➢ श्री. मयुरेश सोहनी, पुणे ➢ श्री. सत्येंद्र वैद्य, पुणे ➢ डॉ. गीतांजली व डॉ. सिद्धार्थ पटवर्धन ➢ सौ. नंदिता गाडगीळ, पुणे ➢ एक हितचिंतक, पुणे ➢ श्री. अमित गद्रे, पुणे ➢ डॉ. प्रणव महाजन, छ. संभाजीनगर ➢ श्री. रवींद्र गजेंद्रगडकर, पुणे

गप्पा आपल्या देशाच्या!
लेखांक - १०

# भारतीयांची वेशभूषा वैविध्य आणि एकात्मता

- डॉ. वर्षा पाध्ये



पंधरा ऑगस्टला जिलबी सामोसे खात असताना मीनलताईने बच्चेकंपनीला भारताच्या भाषेतील विविधतेबद्दल आणि त्यातल्या सारखेपणाबद्दल सांगितलं होतं. अभिजीतदादाला वचन दिल्याप्रमाणे यंदाच्या गणेशोत्सवात तमिळ भाषेतील गाणे बसवायला आणि त्यावर नाच बसवायला दर शनिवारी मंडळी जमत होती. अशाच एका शनिवारी दोनदा नाचाची प्रॅक्टिस झाल्यावर पाणी पिण्यासाठी वानरसेना थांबली असताना मीनलताई तिथं आली.

''काय मंडळी जमताहेत का तमिळ शब्दांचे उच्चार?'' मीनलताईनं विचारलं.

''नाही गं ताई,'' परेश अवघडून म्हणाला. ''काय अवघड आहेत या तमिळ भाषेतील एक-एक शब्द उच्चारायला आणि काही अक्षरंसुद्धा! 'ळ'चे तर म्हणे तीन उच्चार असतात या भाषेत. मी मग शाळेतल्या माझ्या मित्राला श्रीकुमारला विचारलं. त्यानं दहा वेळा म्हणून घेतलं; पण जीभ वळतच नाही गं. तो सुरुवातीला 'खाना'ला 'काना' म्हणायचा तर मी त्याची चेष्टा करायचो; पण आता कळलं की, त्याच्यासाठी ते अवघडच आहे. त्याच्या मातृभाषेत क, ख, ग, घ या अक्षरांमध्ये फरकच नाहीये; पण 'ळ' मात्र तीन आहेत आणि ते चुकीचे उच्चारले, तर वेगळाच अर्थ होतो. आता हे समजल्यावर मी त्याला कधीच हसणार नाही. आणि खरं सांगू, मी त्याची भाषा बोलताना इतक्या चुका केल्या, तरी तो एकदाही हसला नाही.''

''अरे, असंच असतं. आपण एकमेकांना समजून घेतलं की, सगळं सोपं होतं.

काश्मीरमध्ये थंडी असते, म्हणून जाड लोकरीचे कपडे घालावे लागतात; पण तामिळनाडूमध्ये तापमान अधिक आहे, त्यामुळे पुरुष सुटसुटीत लुंगी किंवा वेष्टी घालतात. त्याला हसायचं काहीच कारण नाहीये,'' मीनलताई सांगू लागली.

''ए, त्या सहा 'भ' मध्ये 'भूषा' पण होता ना ताई,'' निखिलची लगेच शंका आलीच, ''तिचा अर्थ पोशाख हाच ना?'' एवढ्यात अभिजीतदादा पण तिथे पोहोचला आणि लक्ष देऊन ऐकू लागला.

''बरोबर निखिल. 'भूषा' म्हणजे आपली वेशभूषा, आपला भारतीय पोशाख. हे बघा, आपला देश उष्ण कटिबंधातला म्हणजे बहुतेक वेळी तापमान २५° सेल्सियस पेक्षा जास्त असतं. त्यामुळे आपण सैलसर कपडे वापरतो. उदाहरणार्थ धोतर, साड्या, परकर-पोलके इ. सगळे कपडे साधारण सैलसर असतात. पूर्वी हवा खेळती राहील असा आपला पोशाख होता; पण हल्ली पाश्चात्य संस्कृतीचे आपण अंधानुकरण करतो. मग आपण भर उन्हात *टाय* घालतो. अगदी काही शाळांच्या गणवेशातही *टाय* असतो,'' मीनलताई म्हणाली.

''पण आता स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी का करतो आपण त्यांचे अनुकरण?'' निखिलनं विचारलं.

दादा म्हणाला, ''अरे, त्यांनी इतकी वर्षं

विविध रुपात घडवी, शक्ती रुपात स्त्री तू प्रेरणा। संस्कार देते, विचार देते, माणूस घडण्या स्त्री तू प्रेरणा ।।
वार्षिक देणगीदार - ➢ सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन ➢ श्री. अनिरुद्ध जोगळेकर ➢ श्री. प्रमोद सी. पेठे, पुणे ➢ श्री. शिवप्रसाद आगटे, पुणे ➢ ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि., पुणे ➢ श्री. विश्वासराव कचरे, तेलंगवाडी, ता. मोहोळ, जि. सोलापूर ➢ सौ. कस्तुरी व श्री. आदित्य मोडक

जगावर राज्य केलं. त्यांचा जगावर रुबाब, वर्चस्व होतं. इतकी वर्षं त्यांनी जगावर राज्य केल्याने त्यांचे अनुकरण सगळेच करतात. त्यातून आपल्या गुलामी मानसिकतेतून आत्ता कुठं आपण बाहेर येतोय; पण हळूहळू बदलत आहेत या गोष्टी.''

मीनलताई म्हणाली, ''घट्ट बसणाऱ्या *जीन पॅन्ट, सूट, टाय* असे पोशाख आपण घालतो; पण आपल्या हवामानाला ते चांगले नाहीत. त्यांच्याकडे खूप थंडी असते, म्हणून ते तसा पोशाख घालतात. आपले पणजोबा-पणजी तर धोतर-सदरा, नऊवारी साडी घालायचे; पण आपण ते विसरलो. अशाने आपल्या सभ्यतेचं, परंपरेचं जतन होत नाही. आपल्या पोशाखाचा आपल्याला अभिमान असला पाहिजे.''

''पण धोतर घालून सायकल कशी चालवणार?'' हसत-हसत परेशने विचारलं.

''का नाही?'' अभिजीतदादा म्हणाला, ''आमचे पणजोबा तर म्हणे दुटांगी धोतर नेसून



सायकल चालावायचे. दक्षिण भारतात तर धोतर, लुंगी नेसून कितीतरी जण आजही मोटरसायकल चालवतात; पण मला असं नाही म्हणायचंय की, सर्वांनी, अगदी तुम्ही मुलांनी सुद्धा धोतर नेसून शाळेत जावं. *शर्ट-पॅन्ट* सुटसुटीत वाटली, तर तीही आपलीशी करावी. माझी आजी नऊवारी साडी नेसायची; पण आई पाचवारी साडी नेसते. आताच्या स्त्रिया पंजाबी सलवार-कमीज असा पोशाख करतात. काळानुसार पोशाखात असे बदल होतच राहणार आणि गरजेनुसार ते व्हावेतही. ताईचं म्हणणं असं आहे की, आपण आपल्या पोशाखाचा अभिमान बाळगायला हवा. पश्चिमात्त्यांच्या पोशाखाचे अंधानुकरण करू नये.''

स्मृती म्हणाली, ''हो, परवा *फेसबुकवर* माझ्या मैत्रिणीने चांद्रयान ३ च्या यशस्वी प्रक्षेपणात सामील असलेल्या इस्रोच्या मोठमोठ्या स्त्री शास्त्रज्ञांचे *फोटो* टाकले होते. त्यात सगळ्या साडीत होत्या. अगदी आपल्या भारतीय पोशाखात. म्हणजे भारतीय पोशाख घातले, तर यशस्वी होणार नाही, असं मुळीच नाही. नऊवारी साडी नेसून कितीतरी वीरांगना लढल्या आहेत आपल्याकडे.''

''अगदी खरं,'' ताई म्हणाली. ''आता पंतप्रधान मोदींचं पाहून बहुतेक सरकारी उच्च अधिकारी, एवढंच काय माझ्या *कॉलेजचे प्रोफेसरसुद्धा* 'मोदी *जॅकेट*' घालू लागले आहेत. माझे बाबा एका परराष्ट्रीय कंपनीत काम करतात. ते सांगत होते की, त्यांच्या कंपनीत आता त्यांचे संचालकसुद्धा गेल्या दोन वर्षात कोविडनंतर *कोट-टाय* सोडून 'मोदी *जॅकेट*' घालू लागलेत. ते म्हणतात की, हे *जॅकेट* दिसतं तर छानच; पण पूर्वी *कोट* घातल्यावर घाम यायचा आणि *टाय* घातल्यावर गळा उगाचच आवळल्यासारखं वाटायचं, तो

वार्षिक देणगीदार - ➢ श्री. कौस्तुभ माणिकराम हळबे ➢ सौ. चारुशीला व श्री. शरद केशव आवटे, पुणे ➢ श्री. राजेंद्र जाधव, पुणे
➢ सौ. सीमा परांजपे, पुणे ➢ डॉ. जयेश रहाळकर, पुणे ➢ सौ. युतिका पटवर्धन, पुणे
➢ श्री. सौमित्र जोशी, पुणे ➢ श्री. हृषिकेश भागवत, बंगळुरु ➢ सीए. निखिलेश सोमण, ठाणे

त्रासही होत नाही. आणि इतकंच नाही तर त्यांच्या जर्मनीतल्या वरिष्ठांना *शर्ट-पॅन्ट* आणि त्यावर बाह्या नसलेलं हे *जॅकेट* फार आवडलं की, ते इथून दोन *जॅकेट* उन्हाळ्यात स्वत: वापरण्यासाठी घेऊन गेले आहेत.''

''अगं दिल्लीतल्या 'जी २०'च्या बैठकीसाठी आलेल्या अनेक राष्ट्राध्यक्षांनी, त्यांच्या पत्नींनी संध्याकाळच्या 'भोजन समारंभा'ला भारतीय पोशाख केला होता. शेवटच्या दिवशी पंतप्रधान मोदींनी त्यांना खास भारतीय उपरणी भेट दिली,'' रोहितने नवी माहिती दिली.

''बरोबर आहे रोहित तुझी माहिती,'' अभिजीतदादाने रोहितच्या खांद्यावर हात ठेवत अनुमोदन दिलं. ''मित्रांनो, तुम्ही जेव्हा-जेव्हा फिरायला म्हणून महाराष्ट्रात किंवा भारतात कोठे जाल, तेव्हा तिथे तयार होणारे पोशाख, *जॅकेट,* टोप्या, विविध कापड प्रकार, साड्या स्वतःसाठी, आई-बाबांसाठी आणि इतरांना देण्यासाठी विकत घ्या. म्हणजे त्यांचा प्रसार होईल आणि स्थानिक कलाकारांना अजून काम मिळेल. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे ती कलाही टिकून राहील.''

''आणि हो,'' मीनलताई म्हणाली, ''आपल्या देवळात जाताना भारतीय पोशाख घालून जावेत. मुलींनी तंग कपडे, *जीन्स, शॉर्टस्* घालून जाऊ नये.''

''पण फक्त मुलींनी व बायकांनीच का? पुरुषांनी व मुलांनी पण भारतीय पोशाख घालावे,'' निखिलने लगेच सुचवलं.

''हो, अगदी बरोबर. पुरुषांनी पण *शर्ट-पँट* ऐवजी देवळात जाताना तरी मुद्दामहून ठरवून झब्बा, पायजमा, धोतर जरूर घालावं.''

''पण का म्हणून? मग आमच्या व्यक्ती स्वातंत्र्याचं काय?'' स्मृती कुरकुरली.

''हे बघा, तुम्ही मजा करायला लग्नात मेहंदीला, हळदीच्या समारंभाला, *डेज्‌ना* वेगवेगळे *ड्रेस कोड* पाळताच ना? मग देवळात आदर दाखवलात आपल्या संस्कृतीला तर काय बिघडलं?'' मीनलताई म्हणाली.

''अरे, दक्षिण भारतात बऱ्याच मंदिरात पुरुषांना खाली धोतर व वरती नुसतं उपरणं घालायला लागतं. नियम म्हणजे नियम,'' अभिजीतदादा म्हणाला.

''खरंय दादा, आपल्या देशात अशीच शिस्त लावली पाहिजे. नियम केले तरच पाळले जातात. नाहीतर मनमानी करतात,'' इकबाल म्हणाला.

''मनातून संस्कृतीवर प्रेम असेल, तर संस्कृतीची जपणूक करण्यासाठी नियम करायची गरजच नाही खरंतर. आपण आपल्या घरातले नियम पाळतो की नाही, तसेच हे नियम पाळावेत,'' दादा म्हणाला.

*''व्हेन इन रोम बिहेव लाइक रोमन,* ही म्हण आपण नेहमी वापरतो, मग मला सांगा, *व्हेन इन भारत...?''* अभिजीतदादाने सर्वांना जोरात प्रश्न विचारला.

*''बिहेव लाइक भारतीय!''* मुले पण तितक्याच उत्साहात ओरडली.


''काय मग, येणाऱ्या नवरात्रीतील तुमच्या विविध गुणदर्शनासाठी त्या-त्या प्रदेशांचे पोशाख घालणार आहात ना तुम्ही?'' मीनलताईने विचारलं.

''होऽऽऽ'' असा मोठा होकार देऊन मंडळी विश्रांती संपवून नाचाच्या पुढच्या *प्रॅक्टिससाठी* तयार झाली.

❁❁❁

**– डॉ. वर्षा पाध्ये**

varshapadhye@yahoo.com



आकृती क्र. ४ : अंतराळयानात वेल्क्रोचा वापर

हे उत्पादन सुरुवातीला लोकांना आवडलं नाही; पण १९६० साली 'नासा'ला हे उत्पादन त्यांच्या अंतराळयानात उपयोगी असल्याचं लक्षात आलं. त्यानंतर माझी लोकप्रियता वाढली. माझ्या *'वेल्क्रो'* या नावावर शिक्कामोर्तब झालं.

''मुलांनो, विविध वस्तूंमध्ये मी तुमच्या कामी येतो. ६०-७० वर्षांनंतरही माझी मागणी कमी झालेली नाही आणि दुसरा पर्यायही मिळाला नाही.''

❁❁❁

**- डॉ. नंदा हरम**
nandaharam2012@gmail.com

## कृतिपाठ

१) 'बरडॉक बी'चे सूक्ष्मदर्शकाखाली निरीक्षण करा.
२) 'झिपर चेन'च्या तुलनेत *वेल्क्रोचे* काय फायदे आहेत?
३) अंतराळयानात कशाकशाकरीता *वेल्क्रो* वापरले गेले? त्याला पसंती का मिळाली?
४) रोजच्या व्यवहारातील वेल्क्रो वापराची ३-४ उदाहरणे सांगा.

छात्र प्रबोधनतर्फे कुमारांसाठी (इ.५ वी ते ११ वी) दरमहा नावीन्यपूर्ण स्पर्धा!

## 'प्रबोधन ऐपावाक' वैयक्तिक व सांघिक स्पर्धा!

**स्पर्धा क्र. ३ - सप्टेंबर-ऑक्टोबर २०२३ या महिन्यातील स्पर्धा**

अनेकांनी मुदत वाढवून मागितल्यामुळे ही स्पर्धा मुदत वाढवून परत देत आहोत; मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हा!

### १. वैयक्तिक स्पर्धा - कवितेला चाल लावणे

- या स्पर्धेसाठी छात्र प्रबोधन अंकातील 'कविता' निवडाव्यात.
- चाल लावलेल्या कवितेची ध्वनिफीत (ऑडिओ) ५-७ मिनिटांपेक्षा जास्त नसावी. यासाठी वाद्यांची साथ-संगत सुद्धा चालेल.
- www.chhatraprabodhan.org या वेबसाइटवर छात्र प्रबोधनचे ३०० पेक्षा अधिक अंक मोफत उपलब्ध आहेत. त्यातून तुम्ही 'कवितेची' निवड करून स्पर्धेसाठी त्याचे वाचन करू शकाल.
- jpprakashane.org या संकेस्थळावर कविता संग्रहाची पुस्तके उपलब्ध आहेत. ती तुम्ही खरेदी करू शकता.

### २. सांघिक स्पर्धा - विज्ञान प्रयोग/ विज्ञान खेळणे

- किमान ३-४ विद्यार्थ्यांचा गट असावा.
- छात्र प्रबोधनच्या अंकातील विज्ञान प्रयोग निवडावेत. ➢ प्रयोग करताना त्याच्या साहित्यासहित विश्लेषण करून प्रयोग केलेली चित्रफीत (व्हिडीओ) पाठवावी. ➢ही चित्रफीत १० मिनिटांपेक्षा जास्त नसावी (त्यात स्पष्ट आवाज व पुरेसा प्रकाश असेल असे पाहावे)

**बक्षिसे - १) वैयक्तिक स्पर्धा -** किमान गुणवत्तेच्यावर पहिल्या ४ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.१००/-छात्र प्रबोधनची प्रकाशने भेट! **२) सांघिक स्पर्धा -** किमान गुणवत्तेच्यावर पहिल्या ४ गटांना प्रत्येकी रु. २५०/- ची छात्र प्रबोधनची प्रकाशने भेट! **बक्षिसप्राप्त विद्यार्थ्यांचे/गटांचे ध्वनी/चित्रफिती 'प्रबोधन ऐपावाक' या ॲपवर प्रसिद्ध होतील. स्पर्धेसाठीचे चित्रफीत/ध्वनिफीत ५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत पुढील इ-मेल आयडी वर पाठवावेत.** त्यामध्ये आपले नाव, शाळा, इयत्ता, दूरध्वनी क्र., कवितेचे व कवीचे नाव/विज्ञान प्रयोगाचे नाव त्याचे तपशील इ. माहिती आवर्जून लिहावी.

**इ-मेल आयडी : aipavakspardha@gmail.com**

**जुलै महिन्यातील प्रबोधन ऐपावाक स्पर्धेचा निकाल**

**पुस्तक परिचय वैयक्तिक स्पर्धा** (ध्वनिफीत) **- १)** चि. निशाद साने, इ.९ वी. पुणे **२)** चि. शाल्व कारेकर, इ. ६ वी **३)** कु. ईश्वरी वालवडकर, इ. ७ वी, सोलापूर **४)** कु. कार्तिकी झोरे, इ. ९ वी, साखरपा

**राष्ट्रभक्तीपर समूहगीत गायन सांघिक स्पर्धा** (चित्रफीत)-
**१)** आपटे प्रशाला, पुणे **२)** बालविकास, सोलापूर
**३)** भारतीय विद्याभवन सुलोचना नातू विद्यामंदिर, पुणे
**४)** बालक मंदिर, नाशिक

स्त्रीशक्तीचा महिमा अपरंपार। शक्ती, संस्कार, कर्तव्य, माणुसकीचे आहे सार।।

वार्षिक देणगीदार -➢श्री. मुकुंद भास्कर कुवर, बोरीवली, मुंबई ➢ श्री. किरण सावरगावकर, पुणे ➢ श्री. शिरीष दामले, पुणे ➢ श्री. संदीप धांडे, पुणे ➢ श्री. केदार वसंत जोशी, पुणे ➢ मुद्देबिहाळकर परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा! ➢ डॉ. वैशाली पाटील-देवरे, शिरपूर, जि. धुळे

नवरात्र... शारदोत्सव...!
त्यानिमित्त स्त्रीशक्तीची
ओळख करून घेऊ या!!







# ओळखा सोबतच्या कर्तृत्ववान भारतीय महिलांना...










त्यासाठी काही क्लृप्त्या –

१. पहिल्या भारतीय महिला डॉक्टर
२. गणितज्ञ
३. भारताच्या राष्ट्रपती
४. अंटार्टिकावर जाणाऱ्या पहिल्या भारतीय महिला
५. भारतीय महिला नेमबाज

सौर आश्विन, शके १९४५/ऑक्टोबर २०२३ पंजीकृत नियतकालिक, **ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan**
**प्रकाशन दिनांक : सौर ९ आश्विन, शके १९४५/१ ऑक्टोबर २०२३**
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR /2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (SDM/Pune/SR/139/2017)
**टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050/2021-2023**
**Date of posting : On 1st day of every month, At the Post office S. P. college, Pune - 30. Date of publication : 1-10-2023**

# मंडला आर्ट



कुमारांच्या कुंचल्यातून : बहुरंग हस्तलिखित – तात्यासाहेब सामंत माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव

| सौर दिनदर्शिका शके १९४५ | | |
|---|---|---|
| | सौर आश्विन कार्तिक | ऑक्टोबर २०२३ |
| र. | आ.९ | 1 |
| सो. | १० | 2 |
| मं. | ११ | 3 |
| बु. | १२ | 4 |
| गु. | १३ | 5 |
| शु. | १४ | 6 |
| श. | १५ | 7 |
| र. | १६ | 8 |
| सो. | १७ | 9 |
| मं. | १८ | 10 |
| बु. | १९ | 11 |
| गु. | २० | 12 |
| शु. | २१ | 13 |
| श. | २२ | 14 |
| र. | २३ | 15 |
| सो. | २४ | 16 |
| मं. | २५ | 17 |
| बु. | २६ | 18 |
| गु. | २७ | 19 |
| शु. | २८ | 20 |
| श. | २९ | 21 |
| र. | ३० | 22 |
| सो. | का. १ | 23 |
| मं. | २ | 24 |
| बु. | ३ | 25 |
| गु. | ४ | 26 |
| शु | ५ | 27 |
| श. | ६ | 28 |
| र. | ७ | 29 |
| सो. | ८ | 30 |
| मं. | ९ | 31 |

**सभासदांनी आपले व्हॉटस्‌ॲप संपर्क क्रमांक कळवले नसल्यास ९०१११६१४४५ या भ्रमणभाषवर लवकरात लवकर कळवावे. म्हणजे सभासदांशी वेळोवेळी संपर्क साधता येईल. स्पर्धा, उपक्रम, व्याख्याने, नवीन प्रकाशने यांची माहिती पोहोचवता येईल.**

छात्र प्रबोधनद्वारा प्रकाशित **दिनदर्शिकेतील ऑक्टोबर महिन्याचे पान** पाहाण्यासाठी क्यू आर कोड स्कॅन करा!

**सौर दिनदर्शिकेचा वापर जरूर करा.**

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (020) 24207 174/175
www.chhatraprabodhan.org
**इ–मेल :** chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**वार्षिक वर्गणी : ₹ २५०/–**
ऑनलाइन वर्गणी भरण्यासाठी व पुस्तक खरेदीसाठी :
**www.jpprakashane.org**

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करत आहात. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे, ही आग्रहाची, प्रेमळ विनंती.

तुमचा–संपादक, छात्र प्रबोधन